# सेवक वार्ता

जुलै -२०२१ वर्ष -२, अंक - ९

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र, पुणे

कार्यालय - ब-८, सारस नगर सोसायटी, शुक्रवार पेठ, पुणे - २


## सेवक संघ धुळे शाखेमार्फत निशुल्क वन विषयक व्याख्यानमालेचा शुभारंभ !


सेवक संघ धुळे शाखेमार्फत दि.१३-६-२०२१ पासून श्री. जयप्रकाश पाटील, सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ धुळे शाखेचे ज्येष्ठ सदस्य व सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी यांचे अधिपत्त्याखाली गुगल मीट ॲपव्दारे वन विषयक व्याख्यान मालेचा शुभारंभ करण्यात आला. श्री. पाटील वेळोवेळी अनेक क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामात येणाऱ्या प्रशासनिक व कायदेविषयक अडचणीबाबत सोशल मीडियावर मार्गदर्शन करत आलेले आहेत. त्याचा लाभ सर्वांना व्हावा व त्यांचे दैनंदिन काम अधिक सक्षमपणे करता यावे म्हणून गूगल मीट ॲपद्वारे व्याख्यानमाला सुरू केली आहे.




दर दुसऱ्या व चौथ्या रविवारी सकाळी १० वा. व्याख्यानमालेचे प्रसारण करण्यात येत आहे. त्यासाठी आवश्यक असणारी लिंक वेळोवेळी सोशल मीडिया ग्रुपवर जाहीर करण्यात येईल. या व्याख्यानांचे चित्रीकरण करण्यात येत असून ते युट्युबवर स्वतंत्र चॅनेलद्वारे प्रसारण करण्याचे नियोजन आहे. हे व्याख्यान पूर्णत निशुल्क उपलब्ध करण्यात येत आहे. कोणाहीकडून कुठलेही शुल्क आकारले जाणार नाही, असा उदात्त हेतू व वन कर्मचारी बंधूंसाठी त्यांनी आपली बांधिलकी जपली आहे.

## प्रधान सचिव (वने) यांना वृक्षधन पुस्तक भेट

दि.२८-६-२१ - कै.विजय भोसले लिखीत व सेवक संघ अमरावती शाखेतर्फे प्रकाशित वृक्षधन पुस्तक मंत्रालयात श्री. वेणुगोपाल रेड्डी, प्रधान सचिव (वने) यांना सेवक संघाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. पाटील यांनी भेट दिले.



### या अंकात . . . .


सेवक संघ धुळे शाखेमार्फत निशुल्क वन विषयक व्याख्यानमालेचा शुभारंभ ..१
वृक्षधन पुस्तक भेट. . . . . . १
विशेष वृत्त . . . . . . . . . १
श्री. गवळी प्रशिक्षणात यशस्वी . . १
विशेष असे काही. . . . . २
सेवक संघ,उपविधीची ओळख. . २


## धुळे शाखेचे सदस्य श्री. एस. के. गवळी Environmental Impact Assessment प्रशिक्षणात ७०% गुण मिळवून यशस्वी

सेंटर फॉर इन्व्हरमेंट ॲंड सायन्स (CSE) नवी दिल्ली या संस्थेमार्फत दिनांक १-१० जुलै २०२१ च्या दरम्यान EIA: A Requirement Beyond Clearance याविषयी १० दिवसाचे ऑनलाइन प्रशिक्षण सत्र घेण्यात आले. त्या सत्रात सेवक संघ धुळे शाखेचे सदस्य श्री. एस. के. गवळी यांनी सहभाग घेतला होता. या प्रशिक्षण सत्रात, पर्यावरण संरक्षणाच्या कायद्यांची जागतिक स्तरावरील व भारतातील वाटचाल, त्यांची अंमलबजावणी, यासोबतच एन्हॉरोमेंटल इम्पॅक्ट असेसमेंट अहवाल तयार करणे, त्यासाठी विविध प्रकारची नैसर्गिक संसाधने - मृदा,जल,वायू जैव विविधता, पारिस्थितीकी संबंधी माहितीचे संकलन,संग्रहण, पृथ्वकरण करणे,विकास कामांचा सामाजिक-आर्थिक परिणामांचा अभ्यास करून पृथ्वकरण करणे,

पर्यावरणाचे व्यवस्थापन आराखडे तयार करणे, विविध विविध पर्यावरण समस्यांच्या केस स्टडीज अशा अनेक विषयांवर विविध क्षेत्रातील निष्णात व अनुभवी तज्ञ यांची व्याख्याने झाली तसेच त्यासंबंधात पावर पॉइंट प्रेझेंटेशन दाखवण्यात आले. त्यासंबंधी प्रशिक्षणार्थींच्या शंकाबाबत प्रश्नोत्तराच्या रुपात समाधान करण्यात आले. देशभरातमन या प्रशिक्षणात १८३ जणांनी सहभाग घेतला होता. हे सत्र श्री. एस. के. गवळी यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले असून त्यांना सत्राअंतर्गत घेण्यात आलेल्या मुल्यांकनात ७० टक्के गुण मिळवले. त्याबद्दल त्यांना प्रमाणपत्र देण्यात आले आहे. पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ अंतर्गत विविध प्रकल्पांसाठी EIA करणे कायद्याने बंधनकारक असून हे काम फक्त अधिकृत संस्थांकडून करण्यात येते. या संस्थांकडे पर्यावरण, वानिकी, वन्यजीव,जलशास्त्र, मृदा शास्त्र सामाजिक शास्त्र अशा विविध शाखांमध्ये तज्ज्ञ व्यक्तीं असणे गरजेचे आहे.विकास प्रकल्पातून होणाऱ्या विघातक परिणामाचे शास्त्रशुद्ध पद्धतीने विश्लेषण करण्यात येते व त्या परिणामाच्या व्यवस्थापन अहवाल तयार करून त्याची अंमलबजावणी करण्यात येते.सध्याच्या परिस्थितीत देशात दिल्ली मुंबई हैदराबाद पुणे अशा शहरात मोजक्याच मान्यताप्राप्त संस्था कार्यरत आहेत. **सेवक संघ अशा संस्थांशी सहयोगाने कामे करण्यास सेवक संघास संधी आहेत.**


ANIL AGARWAL ENVIRONMENT TRAINING INSTITUTE
(A UNIT OF CENTRE FOR SCIENCE AND ENVIRONMENT)

CERTIFICATE OF COMPLETION

Online Course on

EIA: A Requirement Beyond Clearance

This is to certify that Sambha Gawali has successfully completed the online Course on "EIA: A Requirement Beyond Clearance" organised by the Centre for Science and Environment, New Delhi from July 1 – 10, 2021

With best wishes,

Online Course

Centre for Science and Environment

## सेवक संघ,उपविधीची ओळख

### सेवक संघ, महाराष्ट्रचा सुधारीत उपविधी (भाग - ३)

७) संघाच्या मध्यवर्ती व सर्व साधारण सभा, सभेचे अधिकार व सभेचे कार्य

७.१) वार्षिक सर्वसाधारण सभा:वार्षिक सर्वसाधारण सभा, संघाचे वर्ष संपल्यानंतर दोन महिन्याचे आत घेतली जाईल. सभेमध्ये खालील विषय चर्चेत घेतले जातील

७.१.१) संघाच्या वार्षिक अहवालावर चर्चा करणे व त्यास मान्यता देणे.

७.१.२) संघाच्या वार्षिक लेखा-हिशोबपत्रावर चर्चा व त्यास मान्यता देणे.

७.१.३) संघाचे पुढील वर्षाचे वार्षिक अंदाजपत्रकावर चर्चा व मान्यता देणे.

७.१.४) कार्यकारी मंडळाची निवड.

७.१.५) संघाच्या कार्याविषयी सूचना

७.२) मासिक सर्वसाधारण सभा :संघाची मासिक सर्वसाधारण सभा महिन्यातून एकदा घेतली जाईल. या सभेस सव सभासदांना उपस्थित राहता येईल. या सभेस गणपूर्तीची आवश्यकता नाही.

७.२.२) सभासदांना उपयुक्त विषयांवर चर्चा करणे.

८) संघाच्या सर्वसाधारण व वृत्तस्थरीय सभेची सूचना व गणसंख्या

८.१) वार्षिक सर्वसाधारण सभा

८.१.१) संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना १४ दिवस अगोदर दिली जाईल.

८.१.२) संघाच्या ३/१ सभासदांची उपस्थिती गणपूर्तीसाठी आवश्यक राहील. गणपूर्ती नसल्यास अर्ध्या तासाने सदर सभा त्याच ठिकाणी पुन्हा भरविली जाईल व सदर सभेसाठी गणपूर्तीसाठी आवश्यकता राहणार नाही.

८.२) विशेष सर्वसाधारण सभा

अ) विशेष सर्वसाधारण सभा

अ) विशेष सर्वसाधारण सभा कार्यकारी मंडळास जरूर वाटल्यास अथवा संघाच्या ११ (अकरा) सभासदांच्या स्वाक्षरीने व कारणे देउन बोलविता येईल.

ब) अशा विनंती/मागणीनंतर ८ (आठ दिवसांची नोटीस देउन १५ (पंधरा) दिवसामध्ये ही सभा बोलवावी लागेल.

क) अशा सभेसाठी ३/१ सभासद गणपूर्तीसाठी राहणे आवश्यक आहे.

ड)या सभेच्या विषयसुचीवर मागणीचे विषयच फक्त राहतील व फक्त अशा विषयांवर चर्चा करता येईल.

ई) या सभेमध्ये बहुमताने निर्णय घेतले जातील व समान मते पडल्यास अध्यक्षांना जादा मत देण्याचा अधिकार राहील.

---

विशेष असे काही. . *

**श्री. मदन कुलकर्णी पुणे यांची सेवक संघ रौप्यमहोत्सवानिमित्त प्रकाशित करावयाच्या स्मरणिकेसाठी संपादक म्हणून नियुक्ती व संपादन कार्य सुरुवात करण्यासाठी कार्यकारणीची मंजुरी प्रदान केली आहे.**

***कै. गोगटे यांच्या स्मरणिका पुस्तकास "माधवाची वन यात्रा" नावास श्रीमती माधुरी गोगटे यांनी अनुमती दिली आहे. सेवक संघाचे जेष्ठ सदस्य श्री. पत्की यांनी भ्रमण ध्वनी द्वारे त्यांचेशी संपर्क साधुन अनुमती प्राप्त केली आहे.**

---

***कन्हारगाव अभयारण्यातील वन्यप्राण्यांच्या जैवविविधतेचे सर्वेक्षणासाठी जळगाव येथील श्री. अभय उजागरे यांचेशी सहयोग करणेत आला आहे.**

**केवळ खाजगी वितरणासाठी**
**प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे**
**संपादन - एस. के. गवळी**